# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☏: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in  संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac  www.sus.ac.in  विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 797
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक : 17 JUN 2022
Date :

## परिपत्रक क्र. - 35 /२०२२

प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/प्राचार्या व संचालक/विभागप्रमुख सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, माहे जुलै महिन्यात आषाढी एकादशी असल्यामुळे, दि. ४ जुलै २०२२ ते १२ जुलै २०२२ या कालावधीत कोणत्याही परीक्षेचे आयोजन करु नये असे वारी मार्गवरील विविध महाविद्यायांच्या प्राचार्याकडून विद्यापीठास विनंती अर्ज प्राप्त झाले होते. तसेच समाजातील सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांकडून ही विनंती करण्यात आलेली आहे.

माहे मार्च/एप्रिल-२०२२ या सत्र हंगामातील सर्व विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची परीक्षा दि.२० जून २०२२ ते ०६ ऑगस्ट २०२२ या कालावधीत आयोजित केलेल्या आहेत. तसे अंतिम वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ही प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. व हॉलतिकिट ही विद्यार्थ्यांच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

परंतु विविध महाविद्यालयांच्या प्राचार्याच्या व सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांच्या विनंतीनुसार तसेच या वारीमार्गवरील महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी सोयीचे होणार नसल्याने, विद्यार्थी हित लक्षात घेवून माहे मार्च/एप्रिल-२०२२ या सत्र हंगामातील सर्व विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची परीक्षा दि. ४ जुलै २०२२ ते ८ जुलै २०२२ व १२ जुलै २०२२ या कालावधीत आयोजित केलेल्या परीक्षा खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे पुढील तारखेस आयोजित करण्यात आलेल्या आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकातील सत्रानुसार व वेळेनुसार बदललेल्या दिनांकास सदरचे पेपर होतील. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. **सदर तारखेमध्ये झालेला बदल हा परीक्षेशी निगडीत सर्व घटकांच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.** त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन परीक्षेच्या कामात विद्यापीठास सहकार्य करावे.

| अ.क्र. | अंतिम वेळापत्रकातील नमूद केलेली तारीख | बदल करण्यात आलेली तारीख |
|---|---|---|
| १) | दि.०४/०७/२०२२ | दि.०७/०८/२०२२ |
| २) | दि.०५/०७/२०२२ | दि.०८/०८/२०२२ |
| ३) | दि.०६/०७/२०२२ | दि.०९/०८/२०२२ |
| ५) | दि.०७/०७/२०२२ | दि.१०/०८/२०२२ |
| ६) | दि.०८/०७/२०२२ | दि.११/०८/२०२२ |
| ७) | दि.१२/०७/२०२२ | दि.१२/०८/२०२२ |

(डॉ. शिवकुमार गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जावक क्रं. : पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन /वेळापत्रक/२०२२/ 797
दिनांक : 17 JUN 2022

**प्रत- माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव**

(१) मा.प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ. (२) मा.संचालक/विभागप्रमुख, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.